**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, JAN-FEB, 2021, VOL- 8/63*

# मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक या संस्थेचे सामाजिक योगदान: एक अभ्यास

**श्री. काळोगे संजय[1] & प्रा. कैलास खोंडे[2], Ph. D.**

*[1]पी.एच.डी संशोधक*

*[2]पी.एच.डी.मार्गदर्शक*

**Abstract**

*बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य घेऊन सर्वसामान्य,दुर्बल, ग्रामीण,जनते पर्यंत शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचवण्यासाठी महान समाजसुधारक म.ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज यांचे कार्यातून प्रेरणा घेऊन कर्मवीर रावसाहेब थोरात व तत्कालीन समाज धुरिणांनी नाशिक येथे १९१४ मध्ये उदोजी मराठा बोर्डिंग ची स्थापना करून मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेमार्फत शिक्षण कार्याची मुहूर्तमेढ रोवली.*

*मराठा विद्या प्रसारक समाज संस्था शिक्षणाचा प्रसार-प्रचार व्हावा म्हणून स्थापन झाली असली तरी फक्त अध्ययन-अध्यापनातुन विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान न देता अध्ययन-अध्यापना बरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा,शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, समाजातील सर्व घटकांचा शैक्षणिक विकासाबरोबर सामाजिक, सांस्कृतिक, शारीरिक,भावनिक,मानसिक गुणांचा विकास व्हावा म्हणून सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान देते आहे.मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सामाजिक योगदानामुळे विद्यार्थी,शिक्षक, समाजातील घटकांचे जीवनमान उंचावल्याचे दिसून येते.मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सामाजिक योगदानाचा विद्यार्थ्यांनाच नव्हे तर समाजाला इतर शैक्षणिक संस्था, शैक्षणिक क्षेत्रातील घटक ,राज्य व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरविताना फलदायी व प्रेरणादायी ठरेल असा संशोधकास विश्वास वाटतो. आज मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेला विविध सामाजिक क्षेत्रातील योगदानामुळे संस्थेच्या सरचिटणीस श्रीमती नीलिमा ताई पवार यांना जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाला असून संस्थेला विविध पुरस्कार प्राप्त होऊन संस्थेच्या प्रगतीचा आलेख उंचावताना दिसतो आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:-**

सन१९१४ मध्ये स्थापन झालेली शतक महोत्सव साजरा करून १०७ व्या वर्षात पदार्पण केलेली महाराष्ट्रातील एक अग्रगण्य संस्था म्हणजे मराठा विद्या प्रसारक समाज संस्था होय.बहुजनांना शिक्षणाची द्वारे खुली करून बहुजनांच्या विकासाला चालना देणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असले तरी संस्थेचे शैक्षणिक योगदान बरोबर सामाजिक क्षेत्रातील योगदान अग्रगण्य आहे. तळागाळातील प्रत्येक व्यक्ती शिक्षित झाली पाहिजे पण त्याबरोबरच सर्वांचा सामाजिक विकास झाला पाहिजे हा संस्थेचा प्रमुख ध्यास. आणि म्हणूनच मराठा विद्या प्रसारक समाज संस्था शैक्षणिक क्षेत्राबरोबर सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रमांच्या माध्यमातून भरघोस योगदान देते आहे.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

पाच विद्यार्थ्यांना सोबत घेऊन सुरू झालेली मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे आज दोन लाखांचे वर विद्यार्थी ४८५ शाखांमधून ज्ञानार्जन करीत आहे. १९१४ मध्ये ध्येयनिष्ठ संस्था कर्मवीरांनी लावलेली ज्ञानाची तुळस आज जिल्हाभर-राज्यभर मंजिऱ्या होऊन डौलाने बहरते आहे व त्याचे सर्व श्रेय संस्थेच्या सामाजिक उपक्रमांना जाते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजपावेतो मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. मराठा विद्या प्रसारक समाज संस्था शिस्त,पारदर्शकता व गुणवत्ता या त्रिसूत्रीचा आधारावर विकासाची वाटचाल करीत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, शैक्षणिक विकासाबरोबर त्याचा सांस्कृतिक, भावनिक, सामाजिक विकास व्हावा यासाठी नवनवीन उपक्रम राबविले आहे. आज संस्थेची झालेली प्रगती, उत्कर्ष पाहता,, विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात घेतलेली यशाची उंच भरारी पाहता याचे सर्व श्रेय संस्थेच्या सामाजिक क्षेत्रातील योगदानाला जाते. संस्थेच्या सामाजिक उपक्रमामुळे संस्थेतील विद्यार्थी, सेवक,संस्थेची संबंधित सजीव घटक व समाजातील व्यक्तींचे जीवनमान उंचावलेले दिसते व याचा महत्त्वाचा वाटा संस्थेच्या सामाजिक योगदानाचा आहे.

**संशोधन शीर्षक**

मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक या संस्थेचे सामाजिक क्षेत्रातील योगदान: एक अभ्यास

**संशोधन व्याप्ती व मर्यादा:-**

**व्याप्ती:-**

१) प्रस्तुत संशोधन हे नाशिक जिल्ह्यातील मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे संबंधित आहे

२) प्रसू संशोधने नाशिक जिल्ह्यातील मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या सामाजिक क्षेत्रातील योगदाना संबंधित आहे

**मर्यादा:-**

१) प्रस्तुत संशोधन हे केवळ संस्थेत राबविल्या जाणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमातील योगदाना पुरतेच मर्यादित आहे

२) प्रस्तुत संशोधनात संस्थेच्या सामाजिक उपक्रमांपैकी ७ उपक्रमांचा अभ्यास केला आहे.

**कार्यात्मक व्याख्या:-**

**मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक**

महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यात बहुजनांच्या विकासासाठी बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य घेऊन शैक्षणिक प्रचार व प्रसार करणारी एक अग्रणी शैक्षणिक संस्था होय

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**सामाजिक योगदान**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने समाज कार्यात सक्रिय होऊन समाज उन्नतीसाठी विविध सामाजिक क्षेत्रातील जसे तळागाळातील आदिवासी दुर्गम ग्रामीण व शहरी जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी केलेले सामाजिक कार्यातील योगदान होय.

मविप्र विद्यार्थी व सेवक कल्याण निधी

सेवक कल्याण निधी

प्रारंभ- सन १९८६

**उद्देश**-

१)सेवकांना आर्थिक सहाय्य करणे.

२) सेवकांचे जीवनमान उंचावण्यास मदत करणे.

**स्वरूप**-

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या सेवकांना आजारपण, अपघात, सेवानिवृत्ती प्रसंगी व सेवकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत या योजनेमार्फत दिली जाते. आर्थिक मदतीशिवाय ४० वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या सेवकांची मोफत वैद्यकीय तपासणी केली जाते. १९८६ पासुन या योजनेतुन एकुण रुपये ५,७४,०३,५६९ इतकी आर्थिक सहायता सेवकांना देण्यात आलेले आहे.

**विद्यार्थी कल्याण निधी**

प्रारंभ सन १९९०

**उद्देश**

१) हुशार व आर्थिक दृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणे.

२) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्न करणे.

**स्वरूप**-

संस्थेच्या प्राथमिक ते महाविद्यालयीन स्तरावर पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी कल्याण निधी योजना कार्यान्वित असून हुशार व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांना यातून आर्थिक मदत केली जाते. तसेच संस्थेच्या विविध शाखांमधील अपघातग्रस्त गंभीर आजार असलेल्या विद्यार्थ्यांना व मयत विद्यार्थ्यांच्या पालकांना आर्थिक मदत दिली जाते.दरवर्षी या योजनेतून सात ते आठ लाख रुपयांची वाटप विद्यार्थ्यांना केले जाते.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**फलश्रुती-**

१) सेवक कल्याण निधी योजना मुळे सेवकांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली.

२) आर्थिक अडचण दूर होऊन बिकट स्थितीत आर्थिक मदत मिळणे शक्य झाले.

३) हुशार व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळाल्याने पुढील शिक्षण घेणे सुकर होते.

४) विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती होण्यास मदत होते.

**म.वि.प्र.रक्तदान शिबिर**

प्रारंभ- २९ऑगस्ट २०१२

**उद्देश-**

१) सामाजिक बांधिलकी जोपासुन गोरं गरीबांना मदत करणे.

२)राष्ट्र उभारणीसाठी हातभार लाऊन राष्ट्रहीत जोपासणे.

३)रुग्ण सेवा ईश्वर सेवा या उक्तीप्रमाणे सर्वांना मदत करणे.

४) सामाजिक बांधिलकीची जपणूक करून रुग्णसेवा करणे.

५) रक्तदानातून जीवनदान देऊन सामाजिक बांधिलकी जोपासणे.

**स्वरूप-**

राष्ट्रीय क्रिडा दिना निमित्त मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालय व संशोधन केंद्र आडगाव येथे दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित केले जाते.

!!चला करू या दान रक्ताचे राष्ट्रीय क्रिडा दिनी!!

!!नाते जोडुन या बंधुत्वाचे,करूनी संकल्प मनी!!

या ब्रीद वाक्या प्रमाणे सामाजिक बांधिलकी जोपासुन विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,खेळाडु रक्तदान करतात.दरवर्षी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या ७०ते ८० महाविद्यालये, व्यावसायिक कॉलेज मध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करून रक्त संकलन केले जाते.सर्वात जास्त रक्त संकलन करणा-या तीन महाविद्यालयांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.

**फलश्रृती-**

१) मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेतर्फे सामाजिक बांधिलकी जोपासून रुग्णसेवा केली जाते.

२) आर्थिक दुर्बल घटकातील रूग्ण व्यक्तींना मोफत रक्त देऊन हजारो रुग्णांना जीवदान दिले जाते.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

३) मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या सामाजिक कार्यात पर्यायाने राष्ट्र बांधणीत मोलाचा सहभाग दिसून येतो.

**म.वि.प्र.सेवक सहकारी सोसायटी**

स्थापना- १९६२

**उद्देश-**

१) मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या सेवकांना चांगले आनंददायी जीवन जगता येणे.

२) मविप्र सेवा सहकारी सोसायटी मार्फत सेवकांच्या आर्थिक अडीअडचणी सोडवून जीवनमान उंचावणे.

३) मविप्र सेवक सहकारी सोसायटीच्या सेवकांच्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक दृष्ट्या सक्षम बनविणे

**स्वरूप-**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या सर्व सेवकांना चांगले जीवन जगता यावे, त्यांच्या आर्थिक अडचणी दूर व्हाव्यात, त्यांना गरजेनुसार आर्थिक मदत मिळावी, या उदात्त हेतूने मविप्र सेवक सहकारी सोसायटीची स्थापना करण्यात आली. आज सोसायटीने हीरक महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. सेवक सभासदांचे जीवनमान उंचावण्यासाठी संस्थेमार्फत अनेक योजना राबविल्या जातात. कर्जावर ७% टक्के व्याज व ठेवींवर ७%व्याज देणारी महाराष्ट्रातील एकमेव सहकारी सोसायटी. सोसायटी मार्फत सेवकांचा पंचवीस लाख रुपयांचा अपघाती विमा उतरविला असून सभासद कल्याण निधी योजनेतून 25 लाख रुपये पर्यंतचे कर्ज सेवकाचा मृत्यू झाल्यास माफ केले जाते. तसेच सोसायटीच्या गुणवंत सभासद पाल्यांना दहावी बारावी परीक्षा,शिष्यवृत्ती परीक्षा, क्रीडा क्षेत्रात राज्य राष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेल्या सभासद पाल्यांना प्राविण्य मिळवल्याबद्दल रोख रक्कम व स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला जातो. संस्थेच्या आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सभासदाचा, तसेच एम.फिल, पी. एच.डी प्राप्त सभासदाचा उचित गौरव केला जातो. मविप्र सेवक सोसायटीचे उत्कृष्ट कामकाजाबद्दल सहकार भारती कडून राज्यव्यापी 'सहकार सुगंध' तर पणजी येथे उपमुख्यमंत्री रमाकांत खलप यांचे शुभहस्ते "बँको ब्लू रिबन १९२० व महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचा दीपस्तंभ २०२० हा पुरस्कार सेवक सहकारी सोसायटी ला प्राप्त झाला आहे.

**फलश्रुती-**

१) मविप्र सहकारी सोसायटीच्या सभासदांच्या जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे.

२) मविप्र सेवक सहकारी सोसायटी मुळे सेवकांच्या आर्थिक अडीअडचणी दूर होण्यास मदत झाली.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

३) मविप्र सेवक सहकारी सोसायटी मुळे सेवकांच्या पाल्यांना उच्च शिक्षण घेणे, वास्तू,वाहन स्वप्न वास्तव्यात आणणे सहज शक्य झाले.

**बोटक्लब**-

प्रारंभ- सन १९८६

**उद्देश**-

१) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे.

२) विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती निर्माण करणे.

३) विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यास प्रवृत्त करणे.

४) बोट क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शासकीय सेवेच्या संधी उपलब्ध करून देणे.

**स्वरूप**-

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या तीन ते चार महाविद्यालयांमध्ये हा उपक्रम राबविला जातो.

बोटक्लब मार्फत राबिविले जाणारे उपक्रम

१) पूरग्रस्त बचाव अभियान.

२) सिंहस्थ कुंभमेळा मध्ये स्वयंसेवकांचा सहभाग.

३) बोट क्लब ट्रेनिंग सेंटर.

४) NDRF सोबत बचावकार्यासाठी सहभाग.

५) NIS कार्यशाळेत यशस्वी सहभाग.

६) माफक दरात सरावाची संधी.

७) मुलींसाठी मोफत कॅनोईंग प्रशिक्षण शिबिर.

८) महिलांसाठी मोफत पोहण्याचे प्रशिक्षण शिबिर.

**फलश्रुती**-

१) बोट क्लबच्या माध्यमातून विद्यार्थी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होऊन विजयी झालेले आहेत.

२) बोट क्लब मुळे विद्यार्थी शासकीय सेवेत नियुक्त झाले आहेत.

३) मविप्र बोट क्लब उपक्रमांतर्गत दत्तू भोकनळ हा ऑलिंपिक विजेता ठरला आहे.

४) मुलींना सुदृढ व सक्षम बनवणे शक्य होते.

५) बोट क्लब उपक्रमांतर्गत पूरग्रस्तांना मदत, सिंहस्थ कुंभमेळा मदत, करून सामाजिकता जोपासली जाते.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**जलसाक्षरता अभियान**

प्रारंभ-२००१

**उद्देश-**

१) विद्यार्थ्यांना जलसाक्षर करणे.

२) विद्यार्थ्यांना जल हेच जीवन हे पटवून देणे.

३) पर्यावरण संवर्धनाचे महत्व समजावणे.

४) पर्यावरण -हासाच्या दुष्परिणामांची जाणीव करुन देणे.

**स्वरूप-**

दिवसेंदिवस पाण्याचा प्रश्न गंभीर होत चालला आहे वृक्षांच्या वृक्षांच्या संख्येत होत असलेली घट कार्बन-डाय-ऑक्साइडचे वाढते प्रमाण त्यामुळे वाढलेले तापमान पर्यावरणाचा ढासळलेला समतोल हे पाहता जलसाक्षरता उद्बोधन आवश्यक आहे पाणीप्रश्न सोडविण्यासाठी समाजात जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने संस्था जलसाक्षरता अभियान राबवते आहे संस्थेतील शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना हे काम अभ्यास प्रकल्प म्हणून दिले जाते त्यानुसार विद्यार्थी जनजागृती उपक्रम राबवतात पाणी संकट, दुष्काळ जाणीव जागृती करणे पाण्याचा वापर काटकसरीने करणे वृक्षलागवड करणे यावर अभियानातुन उद्बोधन केले जाते.

जलसाक्षरता निर्माण करण्याच्या दृष्टीने वक्तृत्व स्पर्धा निबंध स्पर्धा पथनाट्य जलदिंडी यांचे आयोजन विहीर पुनर्भरण बोअर रिचार्ज शेततळी व तळी याबाबत ग्रामीण भागातील लोकांना मार्गदर्शन करणे. अशाप्रकारे मविप्र संस्था हे जलसाक्षरता अभियान राबवत ए राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एन.एस.एस) ६००० विद्यार्थ्यांना मार्फत हे उपक्रम राबविण्यात आले आहेत.

**फलश्रुती-**

१) विद्यार्थी जलसाक्षर होण्यास मदत होते.

२)पर्यावरण संवर्धन व संरक्षणाचे महत्व समजते.

३)पर्यावरण -हासाचे दुष्परिणाम,हानी याची जाणीव जागृती होते.

४) जीवनात पाण्याचे महत्व समजतेस मदत होते.

जागतिक ऑलम्पिक दिन

प्रारंभ- २०१४

**उद्देश-**

१) ऑलिंपिक स्पर्धे विषयी जनजागृती करणे.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

२) विद्यार्थ्यांना विविध क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करणे.

३) ऑलिंपिक स्पर्धेची तत्वांद्वारे (बंधुता, एकता, समानता) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे.

**स्वरुप-**

ऑलिंपिक स्पर्धे विषयी जनजागृती व्हावी या हेतूने 23 जून हा जागतिक ऑलिम्पिक दिन संस्थेत सात वर्षापासून साजरा करण्यात येतो.एक किलोमीटर अंतराची ऑलम्पिक दौंड प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालया पर्यंत विद्यार्थी प्राध्यापक प्राचार्य मुख्याध्यापक संस्थाचालक पालक सहभागी होऊन पूर्ण करतात.

संपूर्ण भारतातून यशस्वी झालेल्या 12 क्रीडाप्रेमी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येते संस्थेच्या विविध शाखांमध्ये विशेष क्रीडा प्रश्नमंजुषा घेण्यात येते.

**फलश्रृती-**

१) ऑलम्पिक स्पर्धा विषयी जनजागृती होण्यास मदत होते.

२) विद्यार्थी विविध क्रीडा स्पर्धेत सहभागी होतात.

३) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते.

४) विद्यार्थ्यांमध्ये ऑलम्पिक स्पर्धेची तत्व बंधुता, एकता,समानता रुजण्यास मदत होते.

**शैक्षणिक गुणवत्ता पारितोषिक योजना**

प्रारंभ. १९९०

**उद्देश-**

१) विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रावीण्यप्राप्ती साठी प्रोत्साहन देणे.

२) संस्थेच्या व विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी समाजाचा सहभाग वाढविणे.

३) दानशूर व संस्था प्रेमी व्यक्तींकडून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत मिळविणे.

**स्वरूप-**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या विविध शाखांमधून इयत्ता दहावी व इयत्ता बारावी कला वाणिज्य आणि विज्ञान शाखेत तसेच पदवी व पदव्युत्तर परीक्षेत किंवा अभ्यासक्रमात विषयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष पारितोषिके देण्यात योजना संस्थेने जाहीर केलेल्या या योजनेला दानशूर व संस्थेवर प्रेम असलेल्या अनेक व्यक्तींनी सकारात्मक प्रतिसाद देऊन बँकेत कायम रक्कम ठेव म्हणून ठेवली आहे या ठेवींच्या व्याजातून विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली जातात .

**फलश्रुती:-**

१) मविप्र समाज संस्थेच्या प्रगतीमध्ये समाजाचा सहभाग दिसून येतो.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

२) दानशूर व संस्था प्रेमी व्यक्तीं कडून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत मिळते.

३) विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्राविण्य मिळविण्यासाठी प्रोत्साहन मिळते.

४) आर्थिक दुर्बलतेवर मात करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती साधने शक्य होते.

**म.वि.प्र.वैद्यकिय महाविद्यालयाच्या जनहीत योजना-**

प्रारंभ-१९९०

**उद्देश:**

१) विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे.

२) वैद्यकीय महाविद्यालयात मार्फत गोरगरीब रुग्णांना माफक दरात उपचार देणे.

३) आर्थिक दृष्ट्या दुर्बल रुग्णांना मोफत वैद्यकीय सुविधा देणे.

४) बहुजन हिताय बहुजन सुखाय या उक्तीप्रमाणे सर्वांना दर्जेदार आरोग्य सुविधा देऊन नागरिकांचे जीवनमान उंचावणे.

५) सर्व प्रकारच्या आजारांवर एकाच ठिकाणी रुग्णांना आरोग्य सुविधा देणे.

**कार्यवाही-**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉक्टर वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय व संशोधन केंद्रातून फक्त वैद्यकीय अभ्यासक्रमाचे (M B B S, M.D. M.S) शिक्षण दिले जात नाही तर बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य असलेल्या या संस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालय कडून जनहिताचा विचार करून सामाजिक कार्याला हातभार लावला जातो.डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालया द्वारे महात्मा फुले जन आरोग्य योजना. महाराष्ट्र पोलीस कुटुंब कल्याण आरोग्य योजना.कर्मचारी राज्य आरोग्य विमा योजना.भारत प्रतिभूती मुद्रणालयाचे कर्मचारी आरोग्य विमा योजना. जननी सुरक्षा योजना. मेडिकल मोबाईल युनिट. राष्ट्रीय लसीकरण योजना.एमडी इंडिया योजना. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राबविली जाते.

कोरोना काळात संस्थेचे वैद्यकीय महाविद्यालय यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे ५३७२ रुग्णांवर अल्पदरात उपचार केले. जिल्ह्यात प्रथमच ICMR,NABL मान्यताप्राप्त RTPCR चाचणी प्रयोगशाळा सुरू केली जवळजवळ एक लाखावर जास्त स्वॅब तपासणी केली. शहरी व ग्रामीण भागातील २५००पोलिस भगिनींची मोफत वैद्यकीय तपासणी केली. तर ५८२ कोरोना बाधित पोलिस व त्यांचे परिवारातील सदस्यांवर उपचार केले. उपचार घेत असलेल्या रुग्णांना व नातेवाईकांना सकस आहार ,आयुर्वेदिक काढा,फिजियोथेरेपी व मोफत समुपदेशन या पूरक सेवा पुरविल्या मेडिकल कॉलेजच्या कम्युनिटी मेडिसीन विभागाचे वतीने या शाळांमध्ये कोरोना बाबत प्रबोधनपर कार्यक्रम,प्रात्यक्षिके,

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

मार्गदर्शन व्याख्यानांचे आयोजन केले गेले.covid-19 लॉक डाऊन काळात कोटा (राजस्थान) येथे शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना परतत असताना व मुंबईहून लाखोंच्या संख्येने उत्तर भारतात स्वतःचे गावी परतणाऱ्या परप्रांतीयांना महिनाभर भोजनाची व्यवस्था केली. थोडक्यात सामाजिक बांधिलकी जपत मविप्र संस्थेने बहुजन हिताय बहुजन सुखाय ब्रीदवाक्य पूर्णतः सिद्ध केले आहे.

**फलश्रुती**-

१) मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या डॉ वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय द्वारे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तींना मोफत वैद्यकीय सुविधा मिळणे शक्य झाले.

२) मविप्र समाज संस्थेच्या डॉ वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय द्वारे विविध शासकीय वैद्यकीय योजनांचा लाभ सामान्य नागरिकाला मिळू लागल्याने आरोग्य सुविधा घेणे सुकर झाले.

३) दर्जेदार व तत्पर आरोग्य सेवेमुळे अनेक नागरिकांना जीवनदान मिळाले.

४) सर्व प्रकारच्या आजारांवर रुग्णांना एकाच ठिकाणी रुग्णसेवा मिळते.

**समारोप**:-

शतक महोत्सवी परंपरा असलेल्या सं 1914 मध्ये स्थापन झालेल्या मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी केलेली आहे संस्थेचे लाखो विद्यार्थी आज विविध क्षेत्रात नावलौकिक मिळत आहे व कार्यरत आहेत सामाजिक बांधिलकी व सेवावृत्ती जोपासत पारदर्शकता व गुणवत्ता या त्रिसूत्रीच्या माध्यमातून शेतकी वर्षाच्या वाटचालीत काळानुरूप संस्थेने अनेक शैक्षणिक बदल करून प्रगती केलेली आहे आणि म्हणूनच आज मराठा विद्या प्रसारक समाज संस्था सामाजिक क्षेत्रात देत असलेल्या योगदानातून विद्यार्थी विकास व पर्यायाने समाज विकास कसा साधला जातो आहे? संस्थेने राष्ट्राच्या जडणघडणीत सिंहाचा वाटा कसा उचलला आहे? याचा अभ्यास होणे गरजेचे आहे जेणेकरून हा अभ्यास इतर शैक्षणिक संस्था राज्य व राष्ट्र यांच्या शैक्षणिक वर्षासाठी तसेच समाज विकास व विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी एक दीपस्तंभ म्हणून कार्य करेल असा संशोधकाचा मानस आहे

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सामाजिक योगदान पाहता त्याची फलश्रुती पाहता आज विद्यार्थी, समाज, राष्ट्र उभारणीसाठी इतर संस्थांना, प्रेरणादायी म्हणून तर शैक्षणिक धोरण ठरविताना शासनात फलदायी व मार्गदर्शक ठरणार आहे. संस्थेच्या सामाजिक योगदानाची राज्यस्तरावर सर्वांना ओळख होईल असा संशोधकास ठाम विश्वास आहे.

**संदर्भ**:-

**मराठी पुस्तके**:-

*अमृतकुंभ अमृत महोत्सव (सन १९१४-१९८९) मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक.*

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

*मुळे, रा.श. उमाठे, वि.तु. शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे नागपूर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ. (१९८९)*
*पाटील, वा.भा. संशोधन पद्धती प्रशांत पब्लिकेशन २०१२*
*गंगाधर वि. कायंदे-पाटील. चैतन्य पब्लिकेशन्स, नासिक २००९*
*भिंताडे, वि.रा. शैक्षणिक संशोधन पद्धती नित्यनूतन प्रकाशन पुणे.*
*खैरनार, वसंत (२०१२) वसंत चैतन्ययात्री, डॉ वसंत पवार ज्योती प्रकाशन नासिक.*
*मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक या संस्थेची घटना.*

**नियतकालिके:-**

*१०५ वा वार्षिक अहवाल, मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक. सन २०१८-१९*
*१०६ वा वार्षिक अहवाल, मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक. सन२०१९-२०*
*१०७ वा वार्षिक अहवाल, मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक. सन२०२०-२१*
*समाज पत्रिका,जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०१६. सरचिटणीस, मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक.*
*समाज पत्रिका जानेवारी-मार्च २०१८ सरचिटणीस,मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक.*
*५७वा. वार्षिक अहवाल नाशिक जिल्हा मविप्र समाज सेवक सहकारी सोसायटी लि नासिक.सन,२०१९-२०*
*५८वा वार्षिक अहवाल नाशिक जिल्हा मविप्र समाज सेवक सहकारी सोसायटी लि नासिक. सन,२०२०-२१*

**वृत्तपत्रे:-**

*म वि प्र च्या आवारात नागरी आरोग्य केंद्र पुण्यनगरी. ३/९/२०*
*मूवी प्र वैद्यकीय महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा लोकमत. ७/५/१५*
*जागतिक ऑलिंपिक डे निमित्त मविप्र संस्थेतर्फे रंगली मॅरेथॉन रन-दै दिव्य मराठी. २४/५/१९*
*रोइंग स्पर्धेत के टी एच एम महाविद्यालय विजयी सकाळ. १/५/१९*
*वैद्यकीय महाविद्यालयाची मदत (पूरग्रस्तांची आरोग्यदायी तपासणी) महाराष्ट्र टाइम्स. १/८/१९*
*म वि प्र तर्फे चांदोरी येथील पूरग्रस्तांना वैद्यकीय मदतीचा हात.दिव्य सिटी. १०/८/१९*
*राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मविप्र तर्फे रक्तदान शिबिर, गावकरी.१९/८/१९*
*पृथ्वी रक्षणाची विद्यार्थ्यांकडून प्रतिज्ञा महाराष्ट्र टाइम्स. २०/१/२०*
*कोटक महिंद्रा तर्फे म वि प्र चा गौरव गावकरी. २१/१/२०*
*म वि प्र घ्या निलिमाताई पवार यांना जीवन गौरव पुरस्कार, महाराष्ट्र टाइम्स. २६/१/२०*
*म वि प्र चे शिक्षणासोबत सामाजिक क्षेत्रात योगदान देशदूत. २/२/२०*
*मविप्र सोसायटीला ब्लू रिबन पुरस्कार दै. पुढारी/म.टाइम्स. ८/२/२०., १०/२/२०*
*मविप्र समाज संस्थेला सावित्रीबाई फुले पुरस्कार म.टाईम्स. २५/१२/२१*
*मविप्र समाज संस्थेला राष्ट्रीय पुरस्कार लोकसत्ता. २६/१२/२१*

**इंग्रजी पुस्तके:-**

*Best John W Khan,james S.V.(2009) Research in Education ,10th Education.*
*John best, J.M Khan research in education Prentice Hall of India New Delhi Darling Kindersley.*
*Bhch M.B.1983-1988)Vol-2 Forth survey of reserch in education.*

**वेबसाईट:-**

*www.mvp.edu.in.*
*www.infilibent.in*